महाराष्ट्र पोलीस

# पोलीस अधीक्षक कार्यालय, अहमदनगर
# (सायबर पोलीस स्टेशन)

MAHARASHTRA CYBER

**Phone No.** 0241-2323121 **Fax No.** 0241-2416113
**Website-**www.ahmednagarpolice.org **Email-**picybercell.anr@mahapolice.gov.in

## प्रेसनोट

दिनांक-१५/४/२०२०

पोलीस अधिक्षक कार्यालय, अहमदनगर यांचे कडून आपणास आवाहन करण्यात येते की, कोविड -१९ या विषाणुचा वाढता प्रादुर्भाव रोखण्याकरिता शासनाकडुन लॉकडाऊन जाहीर करण्यात आलेले आहे. सदर लॉकडाऊन दरम्यान अत्यावश्यक सेवा बजावणारे व्यक्ती यांना अत्यावश्यक सेवा बजावतांना येणा-या अडचणी विचारात घेवुन तसेच मेडीकल इमर्जन्सी व रक्त्याच्या नातेसंबंधातील व्यक्तींचे अंत्यविधीस जाण्याकरीता येणा-या अडचणी दुर करण्याकरिता पोलीस अधिक्षक कार्यालय, अहमदनगर यांचेकडुन Online Pass देण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. त्याकरिता संबंधीत व्यक्तीने **https://Covid19.mhpolice.in** या WebSite वर जावुन Online अर्ज करणे गरजेचे आहे सदर WebSite वर खालील प्रमाणे अत्यावश्यक सेवा बजावणा-या कर्मचारी/व्यक्ती Online Pass करिता अर्ज करु शकतात किंवा त्यांचे अर्ज विचारात घेतले जातील.

➢ **अत्यावश्यक सेवा मध्ये खालील बाबीचा समावेश करण्यात आलेला आहे.**

- **बॅकिंग क्षेत्रात काम करणा-या व्यक्ती :-** सदर व्यक्तीनी अर्ज करतांना त्यांचे बॅक ओळखपत्र जोडणे आवश्यक आहे.
- **केबल TV :-** सदर व्यक्तीनी अर्ज करतांना परवानगीचे कागदपत्र व ज्या संस्थेकडे काम करत आहे त्या संस्थेचे ओळखपत्र जोडणे आवश्यक आहे..
- **शासनाने सुरु ठेवण्याची परवानगी देण्यात आलेल्या कंपनी :-** सदर व्यक्तीने अर्ज करतांना कंपनीचे ओळखपत्र जोडणे आवश्यक आहे. (टिप- परवानगी असलेले कामगार यांना दररोज मोठया प्रमाणात वाहतुक करता येणार नाही. अशा कामगारांची संबधीत कपंनीने कंपनी जवळच्या ठिकाणी राहण्याची सुयोग्य व्यवस्था असणे गरजेचे आहे. )
- **दुध व्यवसायीक :-** सदर व्यक्तीनी अर्ज करताना परवानगीचे कागदपत्र व संस्थेकडे काम करत असल्यास त्या संस्थेचे ओळखपत्र जोडणे आवश्यक आहे.
- **शासकीय/निमशासकीय/सरकारी महामंडळाचे उपक्रम/अस्थापना:-** शासकीय ओळखपत्र जोडणे आवश्यक आहे.
- **गॅस वितरण :-** संबधीत गॅस एजन्सी यांचे ओळखपत्र जोडणे आवश्यक आहे.
- **हॉस्पीटल / ॲम्ब्युलन्स :-** संबधीत हॉस्पीटलचे ओळखपत्र / अधिकृत पत्र जोडणे आवश्यक आहे.
- **मेडीकल/ फार्मसी :-** संबधीत मेडीकलचे / फार्मसीचे ओळखपत्र / अधिकृत पत्र जोडणे आवश्यक आहे.
- **पेट्रोलपंप :-** संबधीत पेट्रोलपंप कंपनीचे ओळखपत्र /अधिकृत पत्र जोडणे आवश्यक आहे.
- **किराणा दुकान / फळ विक्रेते** :- व्यवसाय परवाना पत्र जोडणे आवश्यक आहे.
- **टेलीकम्युनिकेशन :-** संबधीत कंपनीचे ओळखपत्र / अधिकृत पत्र जोडणे आवश्यक आहे.

Scanned with CamScanner

- **मालवाहतुक :-** संबधीत परवाना प्रादेशीक परीवहन विभाग (RTO) यांचेकडून प्राप्त करावे.
- **पत्रकार :-** शासनाचे अधिकृत असलेले ओळखपत्र जोडणे आवश्यक आहे.
- **इतर :-**
  १. रक्ताच्या नात्यातील अत्यंविधीला जाण्यासाठी दोन व्यक्ती करीता परवानगी (मृत्यू दाखला आवश्यक आहे.)
  २. वैद्यकीय कारणासाठी :- गंभीर स्वरूपाच्या आजारा करीता (उपचार घेत असललेल्या डॉक्टरांचे प्रमाणपत्र आवश्यक आहे. )

वरील प्रमाणे नमुद केलेल्या नागरीकांना / कर्मचा-यांना अर्ज करता येतील सदर परवानगी ही तातडीची गरज समजून प्राधन्यक्रमाने केली जाईल. अर्जामध्ये कोणत्या कालावधी करीता परवानगी गरजेची आहे तो नमुद करणे आवश्यक आहे.

**( अखिलेश कुमार सिंह )**
**पोलीस अधीक्षक, अहमदनगर**

Scanned with CamScanner